मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# एक्सप्रेस वेवर वाहतूक कोंडी.. पुण्यातून मुंबईला जाणाऱ्या सर्व एसटी बस रद्द..!

## पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर झालेल्या टँकर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर झालेल्या टँकर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून या घटनेचा परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवांवर झाला आहे. परिवहन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, या अपघातानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यातील विविध विभागांमधील



एकूण १३९ बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या. यामध्ये ७३ ई-शिवनेरी व ६६ इतर बस फेऱ्यांचा समावेश आहे.

तसेच, या एक्सप्रेस वेवर महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची एकूण १६३ वाहने वाहतूक कोंडीत अडकली होती. यामध्ये सातारा विभागातील ४६, सोलापूर विभागातील ३६, पुणे विभागातील २०, सांगली विभागातील १८, कोल्हापूर विभागातील १३, पालघर विभागातील १२, ठाणे विभागातील ११ आणि मुंबई विभागातील ७ वाहनांचा समावेश आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, परिस्थितीचा आढावा घेऊन पर्यायी व्यवस्था उभारण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येतील, असे महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने कळविले आहे.

# सांगवी जिल्हा रुग्णालयाची दुरावस्था.. आमदार शंकर जगताप यांच्याकडून झाडाझडती

## डॉक्टरांची कमी संख्या, सोलर सिस्टिम, एमआरआय सेंटर बंद; घाणीच्या साम्राज्यामुळे आरोग्यव्यवस्था व्हेंटिलेटरवर..!

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या दुरावस्थेवरुन बुधवारी आमदार शंकर जगताप यांनी रुग्णालय प्रशासनाची चांगली झाडाझडती घेतली."आरोग्य व्यवस्थेची अक्षरशः हेळसांड मांडली आहे". अशा शब्दात त्यांनी प्रशासनाला जाब विचारला. डॉक्टरांची कमी संख्या, सोलर सिस्टिम कार्यान्वित नसणे, एमआरआय सेंटर बंद असल्याबद्दल रुग्णालय प्रशासनाला धारेवर धरले.

सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या कामकाजाबाबत बुधवारी आमदार शंकर जगताप यांनी अचानक पाहणी दौरा दरम्यान आमदार जगताप म्हणाले, हे रुग्णालय पुणे जिल्ह्याच्या आरोग्य सेवेच्या केंद्रस्थानी आहे. अनेक प्रकारच्या वैद्यकीय सुविधा मोफत दरात उपलब्ध असल्यामुळे उपचारांसाठी जिल्ह्यातून या ठिकाणी रुग्णांची मोठी गर्दी असते. मात्र अनेक दिवसांपासून या रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबतच्या तक्रारी केल्या जात होत्या. या संदर्भात वारंवार नागरिकांची निवेदने येत होती. त्या अनुषंगाने आज अचानक रुग्णालयाला भेट दिली. रुग्णालयाला भेट दिल्यानंतर नागरिकांनी केलेल्या तक्रारी पेक्षाही विदारक अवस्था दिसून आली. ठिकठिकाणी अस्वच्छता, मोडकळीस आलेली आसन व्यवस्था, घाणीचे साम्राज्य, रुग्णालयाच्या आवारात सांडलेले सांडपाणी अशा अनेक तक्रारी निदर्शनास आल्या मुख्य म्हणजे डॉक्टरांच्या उपस्थितीची संख्या देखील नियमाप्रमाणे नव्हती असे आमदार जगताप यांनी सांगितले.

यावेळी अति दक्षता विभाग, एक्स-रे सेंटर, एम आर आय सेंटर या ठिकाणी पाहणी केली असता एम आर आय सेंटर बंद असल्याचे दिसून आले तर आयसीयू कक्षा साठी प्रचंड वेटिंग देखील दिसून आली. बऱ्याचदा रुग्णांना सिविल हॉस्पिटल मधून ससून रुग्णालयात रेफर केले जाते अशा तक्रारी देखील नागरिकांनी केल्या डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालयातून अनेक पेशंट इतरत्र पाठवले जातात असे देखील यावेळी निदर्शनास आले.




### रुग्णालयातील "शवागार" बंद ; आरोग्यवस्था गॅसवर

**» या रुग्णालयातील "शवागार" बंद आहे. याशिवाय सोलर सिस्टिम बसवण्यात आलेली आहे. मात्र त्याचे नेट मीटरिंग केलेले नसल्यामुळे अजूनही या प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला नाही. एकीकडे सांगवी जिल्हा रुग्णालयात अनेक सुविधांची वाताहत आहे. याही पलीकडे येथील आरोग्य सेवक असलेले डॉक्टर, नर्स, विविध कर्मचारी या सर्वांनीच आरोग्य व्यवस्था गॅसवर ठेवण्याचे काम केले असल्याचे आमदार म्हणाले. अति दक्षता विभागात देखील कोणतेही सुरक्षेचे नियम पाळले जात नव्हते. बाहेरून आलेले कर्मचारी, पेशंटचे रुग्ण, अगदी डॉक्टर सुद्धा चप्पल बूट घालून फिरत असल्याचे यावेळी निदर्शनास आले.**

### अधिवेशनात लक्ष वेधणार..

**» या रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जपणामुळे १८ जानेवारी २०२६ रोजी सुमित सोनवणे या ३० वर्षे तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली. सुमितला त्रास होत असतानाही त्याला नॉर्मल असल्याचे सांगितले गेले. प्राथमिक जुजबी उपचार करून घरी पाठवण्यात आले. यानंतर घरी सदर रुग्णाला प्रचंड त्रास झाला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला . या दुर्दैवी घटनेबद्दल राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मुंबई येथे होणाऱ्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला आहे असे देखील यावेळी जगताप यांनी सांगितले.**

**"पुणे, पिंपरी चिंचवड तसेच लगतच्या अनेक ग्रामीण भागातून सांगवी जिल्हा रुग्णालयात अनेक रुग्ण उपचारासाठी येतात. जिल्ह्याच्या केंद्रस्थानी असलेल्या या रुग्णालयामध्ये रुग्णांना तात्काळ उपचार मिळणे अपेक्षित आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आरोग्य सेवेला बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे . त्या माध्यमातून अनेक योजना, जिल्हा रुग्णालय, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रुग्णालयांना बळकट करण्याचे काम विविध स्तरातून सुरू आहे. कोणताही रुग्ण उपचाराविना परत जाऊ नये हा भाजपाचा प्राधान्यक्रम आहे. सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या कामकाजाबाबत अनेक अडचणी, तक्रारी माझ्यापर्यंत आल्या. या तक्रारींची शहानिशा करण्यासाठी आज अचानक रुग्णालयाची पाहणी केली. यामध्ये सुधारणा करण्याबाबत डॉक्टर,कर्मचारी सर्वांना सूचना केल्या आहेत. दरम्यान या रुग्णालयातील एका रुग्णाच्या मृत्यूच्या घटनेबाबत मुंबई अधिवेशनात राज्य शासनाचे लक्ष वेधणार आहे.**

**- शंकर जगताप , आमदार,
पिंपरी चिंचवड शहर**

# धुळीच्या साम्राज्यामुळे चिखलीकर त्रस्त

## पाण्याची फवारणी करणाऱ्या गाड्यांची कोट्यावधीची बिले मात्र तरी नागरिकांची गैरसोय; ठेकेदाराचे पालिकेशी संगनमत?

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असतानाच आता प्रदूषणाच्या प्रश्नाने उग्र रूप धारण केले आहे. विशेषतः चिखली परिसरात सध्या धुळीचे लोट उसळत असून स्थानिक नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. मात्र, या गंभीर परिस्थितीतही महापालिकेची धूळ शोषून घेणारी अत्याधुनिक मशिन्स आणि पाण्याचे फवारे मारणाऱ्या गाड्या चिखलीत फिरकत नसल्याने खळबळ उडाली आहे. पाण्याचे फवारे मारणाऱ्या गाड्या केवळ कागदावर आणि ठेकेदाराच्या फायद्यासाठी सुरू आहेत का? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

शहरात बोटावर मोजण्याइतपत गाड्या फिरत असून त्यामध्ये केवळ मुख्य रस्त्यांचाच समावेश असतो. अंतर्गत रस्त्यांवर धुळीचे लोट उसळत असताना तिथे पाणी फवारणी का केली जात नाही? मुख्य रस्त्यांपासून आत गल्ल्यांमध्ये राहणारे नागरिक मालमत्ता कर भरत नाहीत का? असा सवाल विचारत नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले आहेत. या यंत्रणेवर लाखो-कोट्यवधी रुपयांची बिले खर्च केली जात असताना त्याचा फायदा जर सामान्य करदात्यांना मिळत नसेल, तर ही सामान्य नागरिकांच्या पैशाची सरळ सरळ उधळपट्टीच असल्याची भावना व्यक्त होत आहे.



पावसाळा संपल्यानंतर रस्त्यांवरील खडी, माती आणि वाढत्या बांधकामांमुळे हवेची गुणवत्ता कमालीची खालावली आहे. चिखली परिसरात घराघरांवर आणि दुकानांमध्ये धुळीचे जाड थर साचले आहेत. यामुळे सर्दी, खोकला, दमा आणि ब्रॉन्कायटिस सारख्या श्वसनाच्या विकारांमध्ये मोठी वाढ झाली असून, हा थेट नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचे विदारक चित्र आहे.

विकासकामांसाठी सुरू असलेली रस्त्यांची कामे आणि बांधकामे थांबवता येणार नाहीत हे जरी मान्य असले, तरी त्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पाणी फवारणी करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. मात्र, चिखली परिसरात आजतागायत एकदाही या गाड्या फिरल्या नसल्याने प्रशासनाचा हा दुजाभाव चिखलीकरांवर अन्याय करणारा ठरत आहे.

> **" चिखली परिसरातील तक्रारींची दखल घेतली जात असून, त्या भागात पाण्याची फवारणी करणाऱ्या गाड्या का जात नाहीत याची चौकशी केली जाईल. आवश्यक ती पावले उचलली जातील."**
>
> **- संजय कुलकर्णी सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका**

> **"चिखली परिसरातील नागरिक धुळीमुळे अक्षरशः गुदमरत आहेत. प्रशासनाला फक्त मुख्य रस्ते दिसतात का? अंतर्गत रस्त्यांवरील नागरिकांच्या आरोग्याची काहीच किंमत नाही का? धुळीवर नियंत्रण मिळवण्यासाठी असलेल्या यंत्रणा आणि गाड्या चिखलीत का येत नाहीत, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. हे केवळ ठेकेदारांचे भले करण्यासाठी सुरू असलेले काम असून, नागरिकांच्या पैशाचा हा अपव्यय आम्ही खपवून घेणार नाही. महापालिकेने तातडीने अंतर्गत रस्त्यांवर पाणी फवारणी आणि स्वच्छता सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल."**
>
> **- संगीता (नानी) ताम्हाणे, नगरसेविका.**

> **"आमच्या भागात धुळीचा त्रास इतका वाढला आहे की घराच्या खिडक्या उघडणेही कठीण झाले आहे. महापालिकेची धूळ साफ करणारी मशिन्स इतर भागात फिरतात, पण चिखलीत ती कधीच दिसत नाहीत. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन ढिम्म आहे. या धुळीमुळे आमच्या मुलांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत असून प्रशासनाने याची तातडीने दखल घ्यावी.""**
>
> **- राहुल भोसले, सामाजिक कार्यकर्ते**

> **"गेल्या काही दिवसांपासून चिखली परिसरातून येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. प्रामुख्याने श्वसनाचा त्रास, घशाचे इन्फेक्शन, दमा आणि डोळ्यांची जळजळ होण्याचे प्रमाण वाढले आहे. हवेतील सूक्ष्म धुळीचे कण फुफ्फुसांना इजा पोहोचवत असून लहान मुले आणि ज्येष्ठांसाठी ही स्थिती अत्यंत घातक आहे. नागरिकांनी घराबाहेर पडताना मास्कचा वापर करणे आवश्यक आहे.**
>
> **- डॉक्टर भाग्यश्री लहाने मुंडे**

# पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या वतीने अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

## एमआयडीसी मधील लघुउद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम सकारात्मक भूमिका उपमुख्यमंत्री अजितदादा पवार घेत असत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणाऱ्या एमआयडीसी मधील लघुउद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम सकारात्मक भूमिका उपमुख्यमंत्री अजितदादा पवार घेत असत. येथील विज, पाणी, रस्ते, वाहतूक समस्या, मिळकत कर, संघटनेला जागा देणे, लघु उद्योजकांचे पुनर्वसन करणे अशा अनेक प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी कायम तत्परता दाखवून सकारात्मक भूमिका घेऊन वेळोवेळी प्रश्नांची सोडवणूक केली. त्यांचे २८ फेब्रुवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या स्मृती लघुउद्योजकांनी कायम जतन कराव्यात आणि पुढील पिढीस मार्गदर्शक ठराव्यात यासाठी पिंपरी चिंचवड एमआयडीसी परिसरात स्व. अजित दादा पवार यांचे स्मारक उभारावे यासाठी आपण पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या माध्यमातून महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करू, हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल असे पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी सांगितले.




उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि त्यांच्यासोबत विमानात असणाऱ्या इतर ४ व्यक्तींचा २८ फेब्रुवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पिंपरी चिंचवड लघु उद्योग संघटनेच्या वतीने सोमवारी मोशी प्राधिकरण सेक्टर ४, येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष विनोद नाणेकर, सचिव जयंत कड, प्रसिद्धी प्रमुख विजय खळदकर, संचालक संजय सातव, विनोद मित्तल, नवनाथ वायाळ, भारत नरवडे, अतुल इनामदार, सचिन आदक तात्या सपकाळ, सुरेश म्हेत्रे, संजय भोसले, माणिक पडवळ, बशीरभाई तरसगार आदी लघु उद्योजक उपस्थित होते.

यावेळी सुरेश म्हेत्रे म्हणाले की, लघु उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम तत्पर असणाऱ्या अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्यामुळे संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. पिंपरी चिंचवड मधील लघु उद्योजकांच्या दृष्टीने अजितदादा पवार हे लोहपुरुष होते. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी येथे एखादा प्रकल्प सुरू करावा.

संजय आहेर यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना बरोबरच राज्यातील सर्वच लघुउद्योजकांना अजितदादा पवार नेहमी पाठबळ देत होते. पिंपरी चिंचवड एमआयडीसी ला अजित नगर असे नाव देण्यात यावे यासाठी संघटनेच्या वतीने प्रयत्न करावेत.

हर्षल थोरवे म्हणाले की, सर्व लहान थोरांच्या मनात घर केलेला आपला माणूस गमावल्याची भावना आहे. इतरही लघु उद्योजकांनी आपल्या भावना व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली. दोन मिनिटे शांत उभे राहून सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व पसायदान म्हणून श्रद्धांजली सभा विसर्जित करण्यात आली.

# पुण्यातील 'त्या' बसेसची खरेदी संशयाच्या भोवऱ्यात, मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी!

## पुण्याची जीवनवाहिनी असलेल्या 'पीएमपीएमएल' मध्ये 500 सीएनजी बस खरेदीवरून मोठा संशय निर्माण झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) ५०० सीएनजी बस खरेदी प्रकरण गंभीर आरोपांच्या आणि संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहे. कोट्यवधी रुपयांचे कंत्राट, घाईघाईने झालेले निर्णय आणि निवडणुकीआधीचे आर्थिक व्यवहार या सगळ्यांमुळे या व्यवहाराच्या हेतूवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पीएमपीएमएलमध्ये दोन महिन्यांपासून ५०० बस खरेदी विषय गाजत आहे. जे काही घडले, त्यावर आता बारकाईने लक्ष घालण्याची गरज आहे. महापालिका निवडणुकीआधी घाईघाईने अंतिम करण्यात आलेली मोठ्या रकमेची बस कंत्राटे, स्पर्धा मर्यादित करणाऱ्या संशयास्पद निविदा, अटी, शर्ती, निविदा प्रक्रियेत बँक हमीपत्राऐवजी चेक स्वीकारल्याचे आरोप, काही मोजक्या कंत्राटदारांनाच सातत्याने लाभ मिळत असल्याची चर्चा, नवनिर्वाचित महापौर व स्थायी समिति अस्तित्वात येण्याआधीच निर्णय 'सीलबंद' करण्याचा प्रयत्न हे निर्णय केवळ आर्थिकच नाहीत, तर पुणेकरांच्या कराच्या पैशांशी थेट संबंधित आहेत. त्यामुळे बस खरेदीत झालेली गडबड चर्चेचा विषय झाला आहे.



### एलओआय, करार व बँक हमी प्रक्रियेत गंभीर उल्लंघन

» पीएमपीएमएलचे अध्यक्ष कार्यालयात अनुपस्थित असतानाही निविदा फाइल्स मुंबई येथे नेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. १९ जानेवारी रोजी एलओआय देण्यात आली व अवघ्या दोन दिवसांत, २१ जानेवारीला करारावर घाईघाईने स्वाक्षरी करण्यात आली. निविदा अटींनुसार आवश्यक असलेली बँक गॅरंटी न घेता, साध्या चेकद्वारे सुरक्षा ठेव स्वीकारण्यात आल्याचेही उघड झाले आहे.

गेल्या ६० दिवसांत घाईघाईने झालेले कंत्राट निर्णय तपासण्यासाठी कोर्ट ऑफ एन्क्वायरी किंवा अधिकृत चौकशी सुरू होणार का? विशेषत: महापौर व स्थानिक स्वराज्य समित्यांची स्थापना होण्याआधी दीर्घकालीन आर्थिक बोजा निर्माण करणारे निर्णय आणि करार या सगळ्यावर चौकशी झाली, तरच खरं काय ते समोर येईल

या निविदा प्रक्रियेत निविदा दस्तऐवजाची किंमत तब्बल २० लाख रुपये ठेवली होती. 'बेस्ट', 'सीईएसएल', 'एमएसआरटीसी' सारख्या संस्थांमध्ये ही फी काही हजार रुपयांपुरती मर्यादित असते. ही रक्कम इएमडी नसून निविदा फी असल्याने बाहेरील स्पर्धकांना दूर ठेवण्याचा हेतू असल्याचे आरोप होत आहेत.

संबंधित बस खरेदी प्रक्रियेत एक ठेकेदार नव्याने खरेदी होणाऱ्या ५०० बसमध्ये सहभागी आहे. यापूर्वी याच ठेकेदाराला १०० बस संचलनासाठी दिल्या असून, अलीकडेच ८०० बसचे बॉडीबिल्डिंग कंत्राटही त्यालाच मिळाले आहे. मोठी कंत्राटे वारंवार मिळाल्याने तो पीएमपीएमएलचा 'लाडका ठेकेदार' असल्याची चर्चा आहे.

पीएमपीएमएलसाठी हा केवळ प्रशासकीय बदल नाही, तर विश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी आहे. चौकशी झाली तर पारदर्शकतेचा संदेश जाईल. चौकशी टळली, तर संशय अधिक गडद होईल.

### मुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी

» पीएमपीएमएल अंतर्गत अलीकडेच ५०० सीएनजी बस खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र या प्रक्रियेत गंभीर अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. निविदा प्रक्रिया, कंत्राट मंजुरी तसेच आर्थिक बाबींमध्ये पारदर्शकतेचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावी, अशी मागणी होत आहे.

### अतिरिक्त आयुक्तांकडे सूत्रे

» पीएमपीएमएलचे अध्यक्ष प्रशिक्षणासाठी गेले असून, पुढील ३० दिवसांचा कार्यभार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. हा बदल योगायोग आहे की, दबावाचा परिणाम हा प्रश्न राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरतोय.

# पुण्यात जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्याला 1 मेपासून सुरुवात

## ही मोहीम 1 मे ते 15 जून या कालावधीत पुणे महापालिका हद्दीतील 15 क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात राबविली जाणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला १ मेपासून सुरुवात होणार असून, त्यासाठी पुणे महापालिकेची तयारी पूर्ण झाली आहे. भारत सरकारच्या जनगणना संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यात घरयादी तयार करणे व घरगणना हे महत्त्वाचे काम करण्यात येणार आहे. ही मोहीम १ मे ते १५ जून या कालावधीत पुणे महापालिका हद्दीतील १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात राबविली जाणार आहे.

जनगणना प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्य जनगणना संचालनालयाच्या निर्देशानुसार महापालिकेत ३ फेब्रुवारी रोजी विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत जनगणनेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच पुणे शहरातील १५ चार्ज जनगणना अधिकारी आणि शहर जनगणना अधिकारी यांना आगामी मोहिमेबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीदरम्यान जनगणनेचे सर्व कामकाज ठरवून दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले. प्रशासनाच्या दृष्टीने यंदाची जनगणना अनेक अर्थांनी महत्त्वाची ठरणार आहे. कारण भारतात प्रथमच जनगणना प्रक्रिया पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार आहे. त्यामुळे पारंपरिक कागदी नोंदीऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती संकलन करण्यात येणार आहे.

डिजिटल जनगणनेच्या पार्श्वभूमीवर प्रगणकांची नियुक्ती, त्यांचे प्रशिक्षण, आवश्यक तांत्रिक साधनसामग्री तसेच माहिती संकलनासाठी लागणारी डिजिटल व्यवस्था याबाबत विशेष दक्षता घेण्यात येत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार सर्व पूर्वतयारी पूर्ण करण्यावर महापालिकेचा भर आहे. प्रगणकांना डिजिटल उपकरणांच्या वापराबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात येणार असून, माहिती संकलनात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी नियंत्रण व देखरेख व्यवस्था अधिक कडक ठेवली जाणार आहे.

### महापालिकेच्या वतीने आवाहन

» पुणे शहराचा वेगाने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि नागरी सुविधांचे नियोजन या सर्व बाबींच्या दृष्टीने जनगणनेतील आकडेवारी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे घरयादी व घरगणना या पहिल्या टप्प्यातील काम अत्यंत काटेकोरपणे पार पाडण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. आगामी काळात नागरिकांनीही या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (अ.प.) व भाजप आमनेसामने

## 73 पैकी 59 गटांत थेट लढत; अजित पवारांच्या निधनामुळे प्रचाराची रंगत बदलली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये राज्यातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) आणि भाजपमध्येच लढत रंगणार आहे. जिल्ह्यातील 73 गटांपैकी तब्बल 59 गटांत राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) आणि भाजप समोरासमोर उभे ठाकले आहेत. आंबेगाव, मावळ आणि मुळशी तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादी आमनेसामने आहेत. 2017 च्या जिल्हा परिषद निवडणुकीत अखंड राष्ट्रवादी काँग्रेस सर्वांत मोठा पक्ष ठरला होता. मात्र, यंदा भाजपने आक्रमक रणनीती आखल्याने चित्र बदलण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निवडणूक प्रचारकाळातच विमान दुर्घटनेत आकस्मिक निधन झाल्याने या निवडणुकीचा पार नूरच पालटून गेला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी 7 फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, एकूण 299 उमेदवार रिंगणात आहेत. जिल्ह्यातील सत्तासमीकरणे यंदा प्रामुख्याने भाजप आणि राष्ट्रवादीच्या कामगिरीवर अवलंबून राहणार आहेत. दोन्ही पक्षांनी जवळपास सर्वच गटांत ताकद लावल्याने लढत चुरशीची होणार आहे. शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा), काँग्रेस तसेच मोठ्या संख्येने उभे राहिलेले अपक्ष उमेदवारही अनेक गटांत निकालांवर निर्णायक प्रभाव टाकू शकतात.

भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (उबाठा) हे पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहेत. मात्र, महापालिका निवडणुकीप्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही गट एकत्रितपणे लढत असल्याचे चित्र आहे. काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीशी आघाडी केली असून, या आघाडीची कामगिरीही लक्षवेधी ठरणार आहे. पक्षनिहाय उमेदवारांचा विचार करता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 71 गटांत निवडणूक लढवत असून सर्वाधिक जागांवर उमेदवार देणारा पक्ष ठरला आहे. त्यापाठोपाट भाजपने 59 गटांत उमेदवार उभे केले आहेत, तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे 7 उमेदवार रिंगणात आहेत. शिवसेना (शिंदे गटाने) 36, तर शिवसेना (उबाठा) पक्षाने 26 ठिकाणी उमेदवार दिले आहेत.

सन 2017 च्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे वर्चस्व, शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर मागील 2017च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने 44 जागा जिंकून जिल्हा परिषदेवर एकहाती सत्ता मिळवली होती. शिवसेना 13 जागांसह दुसऱ्या क्रमांकावर होती, तर भाजप आणि काँग्रेसला प्रत्येकी 7 जागांवर विजय मिळाला होता. या वेळी चित्र कसे राहील आणि कोणता पक्ष आघाडी घेईल, याकडे सर्वांचे लक्ष आहे.




### दोन्ही शिवसेनेचे एकमेकांसमोर उभे

**» याशिवाय काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राष्ट्रीय समाज पक्ष (रासप) आणि बहुजन समाजवादी पक्ष (बसपा) यांचे उमेदवारही विविध गटांत आपले नशीब आजमावत आहेत. मोठ्या संख्येने असलेले अपक्ष उमेदवार अनेक ठिकाणी लढतीचे गणित बिघडवू शकतात. विशेषतः हवेली, दौंड, शिरूर आणि इंदापूर या तालुक्यांत भाजपद्धराष्ट्रवादी संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, आंबेगाव, मावळ आणि मुळशी येथे दोन्ही राष्ट्रवादी गट समोरासमोर आल्याने या तालुक्यांतील निकालांकडे कार्यकर्त्यांचे विशेष लक्ष राहणार आहे. खेड, जुन्नर, भोर मध्ये दोन्ही शिवसेनेचे एकमेकांसमोर उभे राहिले आहेत.**

### अजित पवारांच्या निधनामुळे प्रचारावर परिणाम

**» जिल्हा परिषद निवडणुकीसाठी प्रचार जोमात अतानाच बारामती येथे झालेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेससह सर्वच पक्षांनी जाहीर प्रचार, सभा आणि रॅली टाळल्या. या काळात केवळ वैयक्तिक गाठीभेटी आणि पत्रके वाटून मर्यादित स्वरूपात प्रचार करण्यात आला. अजितदादांच्या निधनाने त्यांच्या पक्षाचे उमेदवार, नेते यांना तर मोठा धक्का बसला त्यांची बहुसंख्य मदार अजितदादांच्या सभांवर अवलंबून होती. या धक्क्यातून सावरत त्यांनी प्रचार सुरू केला आहे. बऱ्याच कालखंडानंतर अजित पवार यांच्या होणाऱ्या दणकेबाज सभा या निवडणूक प्रचारात होत नसल्याने प्रचार सुनासुना झाला आहे.**

---

# पुरंदर विमानतळाचे काम लवकर सुरु होणार

## पुरंदर विमानतळाची निर्मिती केली जात असून त्यासाठी आवश्यक जमीनीचे तातडीने भूसंपादन करण्याचे आदेश देवेंद्र फडणवीस दिले.

**पुणे | प्रतिनिधी**

वेगाने होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे पुणे शहर व परिसर गुंतवणुकीचे आकर्षण बनले आहे. त्यामुळे शहर व परिसरात औद्योगिकरण आणि नागरीकरणाचा वेगही गतिमान आहे, अशा परिस्थितीत भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती केली जात असून त्यासाठी आवश्यक जमीनीचे तातडीने भूसंपादन करण्याचे आदेश देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले.

पुरंदर विमानतळ विकासकामांचा आढावा बैठकात फडणवीस बोलत होते. या विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेची विशिष्ट पद्धत ठरविण्यात यावी. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भूसंपादनाची कार्यवाही वेळेत पूर्ण करावी. विमानतळ विकासामध्ये सिडको, नगरविकास विभाग यंत्रणांनी आपली जबाबदारी निश्चित करून भूमिका यशस्वीपणे पार पाडावी. विमानतळ निर्माण झाल्यानंतर हा परिसर डेव्हलपमेंट झोन म्हणून पुढे येणार आहे. त्या अनुषंगाने सिडकोने परिसरात आत्ताच जमीन उपलब्धतेची खात्री करून घ्यावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पुरंदर विमानतळाच्या उर्वरित भूसंपादनाची अधिसूचना 'एमआयडीसी'ने काढावी तसेच निधीची उपलब्धतेबाबत विशिष्ट पद्धत ठरवण्यात यावी. विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत आणावा. सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील वनपुरी, कुंभार वळण, उदाची वाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या सात गावात पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. या गावांमध्ये भूसंपादनासाठी गाव निहाय उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी दर्जाचे भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रस्तावित क्षेत्रापैकी १२१६ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करावी. या संयुक्त मोजणीचा, हरकतींचा अहवाल सरकारला सादर करण्यात यावा, असे आदेशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



### मुख्यमंत्र्यांचे आदेश

**» विमानतळ विकासासाठी निधी उपलब्धतेचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत आणावा. सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील वनपुरी, कुंभार वळण, उदाची वाडी, एखतपूर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या सात गावात पुरंदर विमानतळासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. या गावांमध्ये भूसंपादनासाठी गाव निहाय उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी दर्जाचे भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रस्तावित क्षेत्रापैकी १२१६ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करावी. या संयुक्त मोजणीचा, हरकतींचा अहवाल सरकारला सादर करण्यात यावा, असे आदेशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.**